

| वर्ष - 7 | अंक - 266 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- तो इतरांपेक्षा वेगळा कसा ठरतो?
- शॉर्टला परवानगी नव्हती
- मोदींचं ४०० जागांचं स्वप्न भंगणार?
- मंत्रालयात बसलेली टोळी गुंडांची!

www.mahaenews.com | शुक्रवार, दिनांक 09 फेब्रुवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# मावळ, शिरुरचा गड जिंकण्यासाठी अजित पवारांची ‘ॲडमिनिस्ट्रेटिव्ह डिप्लोमसी’!

## आगामी लोकसभा, विधानसभा निवडणुकीची मोर्चेबांधणी

## भाजपाची प्रशासकीय कोंडी, शिवसेनेला तगडे आव्हान






। नवी दिल्ली । विशेष प्रतिनिधी । महाईन्यूज

**आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादीचे वर्चस्व असलेल्या पुणे, सातारा आणि कोल्हापूर या तीन जिल्ह्यात राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ‘ॲडमिनिस्ट्रेटिव्ह डिप्लोमसी’ प्रभावीपणे राबवली आहे. जिल्ह्याची सूत्रे पालकमंत्री म्हणून ताब्यात आहेचत, पण जिल्हाधिकारीपदी आपल्या मर्जीतील अधिकारी बसवून पवार यांनी भाजपाची प्रशासकीय कोंडी आणि शिवसेना शिंदे गटसमोर तगडे आव्हान निर्माण केले आहे.**



पक्षाचे आमदार आणि खासदार यांचा यांचा पाठिंबा आणि तांत्रिकदृष्या सक्षम बाजू असल्यामुळे केंद्रीय निवडणूक आयोगाकडून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पक्ष आणि निवडणूक चिन्ह ‘घड्याळ’ आपल्यालाच मिळणार, असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांना होता. मात्र, केवळ पक्ष आणि चिन्ह सोबत घेवून आगामी निवडणुकीत वर्चस्व राखता येणार नाही. त्यासाठी प्रशासकीय ताकदही सोबत असायला हवी, अशी रणनिती पवार यांनी आखली आहे. त्यामुळे अपेक्षेप्रमाणे पुणे जिल्ह्यात आपल्या मर्जीतील अधिकारी बसवण्यासाठी त्यांनी ‘पॉवर’ वापरली आहे. पुण्याचे नवे जिल्हाधिकारी म्हणून सुहास दिवसे यांची नियुक्ती करण्यात आली. डॉ. राजेश देशमुख पुण्याचे आधीचे जिल्हाधिकारी होते. त्यांच्या जागी सुहास दिवसे यांची नियुक्ती केली असून, डॉ. राजेश देशमुख यांची क्रीडा आयुक्त म्हणून रुजू होणार आहेत.

वास्तविक, दिवसे यांनी याआधी पुण्याचे निवासी उपजिल्हाधिकारी म्हणून देखील काम केलेले आहे तसेच ते पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण अर्थात ‘पीएमआरडीए’चे आयुक्त म्हणून देखील काम पाहिलेले आहे. उपमुख्यमंत्री आणि पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या मर्जीतील यांच्या जवळील अधिकारी म्हणूनही दिवसे ओळखले जातात.

विशेष म्हणजे, दिवसे यांच्या नियुक्तीला शिवसेना शिंदे गटाच्या लोकप्रतिनिधींचा विरोध होता. राज्यात एकनाथ शिंदे यांचे सरकार स्थापन झाल्यानंतर पुण्यामध्ये त्यांनी पहिली बदली दिवसे यांची केली होती. शिंदे यांनी मुख्यमंत्री पदाचा पदभार घेतल्यानंतर दुसऱ्याच दिवशी दिवसे यांच्या पीएमआरडीएच्या आयुक्त पदावरुन उचलबांगडी केली होती. मात्र, अजित पवार यांचा सत्तेत सहभाग झाला. त्यांच्याकडे उपमुख्यमंत्रीपद मिळाले. तसेच, पालकमंत्री म्हणून पुण्याची राजकीय सुभेदारीही मिळाली. त्यामुळे अजित पवार यांनी ‘ॲडमिनिस्ट्रेटिव्ह डिप्लोमसी’ केली आहे. विधानसभा निवडणुकीमध्ये ज्या अजित पवार यांच्याशी पंगा घेतला. त्यांच्याकडे भाजपाच्या स्थानिक नेत्यांना पायधरणी करावी लागणार आहे.




मतदार संघातील कामे व विकासकामे करण्यासाठी पवार यांच्याकडे पाठपुरवा करावा लागणार आहे. आयुक्त, पोलीस आयुक्त, जिल्हाधिकारी अशा पदांवरील अधिकारी यांच्यावर अजित पवार यांचा प्रचंड वचक आहे. त्यामुळे भाजपाचे नेते, पदाधिकारी यांची मोठी कोंडी होणार आहे. आमदारांचा कसातरी निभाव लागेल, पण भाजपा पदाधिकारी, सामान्य कार्यकर्त्यांचे काय? असा प्रश्न निर्माण झाला आहे. तूर्तास, ‘ॲडमिनिस्ट्रेटिव्ह डिप्लोमसी’मध्ये अजित पवार प्रचंड यशस्वी झाले असून, जिल्ह्यातील कामगिरीचा आलेख उंचावण्याचे आव्हान भाजपा आणि शिवसेनेसमोर कायम आहे.

### वर्चस्व टिकवण्याची लढाई...

» पुणे जिल्ह्यातील २१ विधानसभा मतदार संघ आहेत. २०१९ च्या निवडणुकीमध्ये भाजपाचे एकूण ९ आमदार आहेत. तर राष्ट्रवादीचेही १० आमदार आहेत. काँग्रेसला २ जागा मिळाल्या आहेत. त्यामुळे पुणे जिल्ह्यात राष्ट्रवादीचे वर्चस्व भाजपापेक्षा जास्त आहे. दुसरीकडे, शिवसेनेला एकही जागा मिळालेली नाही. लोकसभा निवडुकीत मावळ शिवसेनेकडे आणि शिरुर राष्ट्रवादीने जिंकला आहे. त्यामुळे शरद पवार यांच्यासोबत फारकत घेतल्यानंतर अजित पवार यांना राजकीय वर्चस्व टिकवण्यासाठी पुणे जिल्हात पक्षाचे वर्चस्व कायम ठेवावे लागणार आहे. ‘महायुती’मधील रस्सीखेचमध्ये पुणे जिल्ह्यात दबदबा कायम ठेवण्यासाठी अजित पवार प्रयत्नशील आहेत. मावळ लोकसभा मतदार संघातील पार्थ पवार यांच्या पराभवाचा वचपा त्यांना काढायचा आहे आणि शिरुरमध्ये डॉ. अमोल कोल्हे यांचा करेक्ट बंदोबस्त करायचा आहे. त्यामुळे प्रशासकीय यंत्रणा हाताशी ठेवण्याची मोठी रणनिती आखण्यात आली आहे. जिल्हाधिकारी तुषार दिवसे यांच्या नियुक्तीनंतर यावर शिक्कामोर्तब झाले आहे.

### भाजपा आमदारांचा निभाव लागणार का?

»पुणे जिल्ह्यात भाजपाचे ९ आमदार आहेत. २०१९ च्या निवडणुकीत राष्ट्रवादी आणि काँग्रेसशी दोनहात करुन या आमदारांनी भाजपाचे ‘कमळ’ फुलवले आहे. त्यावेळी अजित पवारांशी खुला पंगा या आमदारांनी घेतला होता. भाजपा पक्षश्रेष्ठींनी पुणे जिल्हा जणू अजित पवार यांना ‘आंदन’ दिला आहे, अशी प्रशासकीय व राजकीय स्थिती आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत भाजपाच्या विद्यमान आमदार, पदाधिकाऱ्यांचा निभाव लागणार का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

# पुण्यात लवकरच स्कायबस : फडणवीस!

## सेवा विधेयकातील तरतुदीनुसार निधी देण्यासाठी पाठपुरावा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**हिंजवडीतील आयटी पार्क आणि औद्योगिक भागातील आस्थापनांपर्यंत पोहोचण्यासाठी स्कायबस हा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. त्यामुळे मेट्रोला पूरक सेवाही मिळणार आहे. या प्रकल्पाच्या परवानगीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली असून, लवकरच त्याचे भूमिपूजन केले जाईल, अशी माहिती राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे गुरुवारी दिली. पुणे कॅन्टोन्मेंट बोर्डाचे सर्व प्रश्न सोडविले जातील आणि वस्तू आणि सेवा विधेयकातील तरतुदीनुसार निधी देण्यासाठी पाठपुरावा केला जाईल.**

त्यासाठी बैठक घेतली जाईल, असे आश्वासनही त्यांनी दिले.पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघातील विविध विकासकामांचे भूमिपूजन फडणवीस यांच्या हस्ते गुरुवारी झाले. राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, पुणे कॅन्टोन्मेंटचे आमदार सुनील कांबळे, माधुरी मिसाळ, भीमराव तापकीर, सिद्धार्थ शिरोळे, माजी खासदार संजय काकडे या वेळी उपस्थित होते. राज्यात पाच वर्षे भाजपचे राज्य होते. त्या वेळी पुणे शहराचे चित्र आणि चेहरा बदलण्याचे काम करण्यात आले. विविध प्रकारच्या विकास योजना, राज्य, केंद्र आणि महापालिकेच्या माध्यमातून राबविण्यात आल्या. पीएमपीच्या ताफ्यात सर्वाधिक विजेवर धावणाऱ्या गाड्या असून, देशपातळीवर या प्रारूपाचा गौरव करण्यात आला असून, ते देशातील अनेक राज्यांनी, शहरांनी स्वीकारले आहे, असे फडणवीस यांनी सांगितले.ते म्हणाले, की शहरात मेट्रोचे काम वेगाने प्रगतिपथावर आहे. मेट्रोच्या भुयारी मार्गाची चाचणीही झाली असून, येत्या काही दिवसांत शहरातील तिन्ही मेट्रो मार्गिका पूर्ण क्षमतेने



कार्यान्वित होणार आहेत. शहरात ५५ किलोमीटर लांबीचे मेट्रो मार्गिकांचे जाळे निर्माण केले जाणार आहे. मेट्रो सेवेला पूरक सेवा म्हणून स्कायबसचा प्रयोगही राबविण्यात येणार आहे. विशेषत: हिंजवडीसारख्या औद्योगिक क्षेत्रात या प्रकल्पाची अंमलबजावणी केली जाईल.

त्यामुळे औद्योगिक क्षेत्रातील प्रत्येक आस्थापनेपर्यंत वेळेत पोहोचणे शक्य होणार आहे. या प्रकल्पासाठी परवानगी घेण्यासाठीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांची वेळ घेऊन त्याचे लवकरच भूमिपूजन केले जाईल. पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांतर्गत जाणारा वर्तुळाकार मार्ग हा शहराच्या विकासासाठी नवी संधी आहे. या वर्तुळाकार मार्गासाठी ८० टक्के भूसंपादन पूर्ण झाले असून वर्तुळाकार मार्गामुळे अडीच लाख कोटी रुपयांची अर्थव्यवस्था पुण्यात निर्माण होणार आहे. त्यामुळे हा मार्ग इकॉनॉमिकल कॉरिडॉर ठरणार आहे. याशिवाय मिसिंग लिंकमुळे पुणे आणि मुंबई शहरातील अंतर कमी होणार आहे. देशातील भविष्यातील शहर म्हणून पुण्याकडे पाहिले जात आहे. त्यामुळे सर्वसामान्य माणसाच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन करावे लागणार असून, त्यासाठी विविध योजना राबविण्याचे

### विकासासाठी नवी संधी

» विशेषत: हिंजवडीसारख्या औद्योगिक क्षेत्रात या प्रकल्पाची अंमलबजावणी केली जाईल. त्यामुळे औद्योगिक क्षेत्रातील प्रत्येक आस्थापनेपर्यंत वेळेत पोहोचणे शक्य होणार आहे. या प्रकल्पासाठी परवानगी घेण्यासाठीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांची वेळ घेऊन त्याचे लवकरच भूमिपूजन केले जाईल. पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांतर्गत जाणारा वर्तुळाकार मार्ग हा शहराच्या विकासासाठी नवी संधी आहे. या वर्तुळाकार मार्गासाठी ८० टक्के भूसंपादन पूर्ण झाले असून वर्तुळाकार मार्गामुळे अडीच लाख कोटी रुपयांची अर्थव्यवस्था पुण्यात निर्माण होणार आहे. त्यामुळे हा मार्ग इकॉनॉमिकल कॉरिडॉर ठरणार आहे.

नियोजित आहे, असेही फडणवीस यांनी सांगितले.राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, पुणे कॅन्टोन्मेंटचे आमदार सुनील कांबळे, माधुरी मिसाळ, भीमराव तापकीर, सिद्धार्थ शिरोळे, माजी खासदार संजय काकडे या वेळी उपस्थित होते. राज्यात पाच वर्षे भाजपचे राज्य होते. त्या वेळी पुणे शहराचे चित्र आणि चेहरा बदलण्याचे काम करण्यात आले. विविध प्रकारच्या विकास योजना, राज्य, केंद्र आणि महापालिकेच्या माध्यमातून राबविण्यात आल्या. पीएमपीच्या ताफ्यात सर्वाधिक विजेवर धावणाऱ्या गाड्या असून, देशपातळीवर या प्रारूपाचा गौरव करण्यात आला असून, ते देशातील अनेक राज्यांनी, शहरांनी स्वीकारले आहे, असे फडणवीस यांनी सांगितले.ते म्हणाले, की शहरात मेट्रोचे काम वेगाने प्रगतिपथावर आहे. मेट्रोच्या भुयारी मार्गाची चाचणीही झाली असून, येत्या काही दिवसांत शहरातील तिन्ही मेट्रो मार्गिका पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होणार आहेत. शहरात ५५ किलोमीटर लांबीचे मेट्रो मार्गिकांचे जाळे निर्माण केले जाणार आहे. मेट्रो सेवेला पूरक सेवा म्हणून स्कायबसचा प्रयोगही राबविण्यात येणार आहे.

# पुणे विमानतळावर मागील काही वर्षांत प्रवाशांची गर्दी

## खासदार बारणे यांच्या हिंदीतील प्रश्नावर सिंधिया मराठीत उत्तर

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे विमानतळावर मागील काही वर्षांत प्रवाशांची गर्दी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. या विमानतळावर भारतीय वायु सेनेच्या विमानांचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे प्रवाशांच्या सोईसाठी जिल्ह्यातील इतर ठिकाणी विमानतळ उभारण्याचे नियोजन केले आहे का?**

असा प्रश्न मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी हिंदीतून लोकसभेत विचारला. त्यावर केंद्रीय हवाई वाहतूक मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांनी मराठीत उत्तर दिले.खासदार बारणे म्हणाले की, पुणे, पिंपरी-चिंचवड शहर आणि जिल्हा परिसराची लोकसंख्या दोन कोटीवर पोहोचली आहे. पुणे शैक्षणिक, व्यवसायिक, माहिती व तंत्रज्ञाननगरी असून देश-विदेशातून प्रवाशी विमानाने पुण्यात येतात. विमानतळावरून आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत हवाई वाहतूक सुरू आहे. विमानतळावर प्रवाशांची संख्या मोठी असून हे विमानतळ देशातील दहाव्या क्रमांकाचे आहे. हे विमानतळ भारतीय वायुसेनेचे मुख्य बेस आहे. त्यामुळे वायुसेनेच्या वेळापत्रकानुसार चालविले जाते. परिणामी, भारतीय वायू सेनेच्या विमानांचे प्रमाण जास्त आहे.



त्यामुळे प्रवाशांच्या सोईसाठी जिल्ह्यातील इतर ठिकाणी विमानतळ उभारण्याचे नियोजन आहे का?त्यावर मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया मराठीत उत्तर देत म्हणाले, मी मराठी माणूस आहे. पुण्याची वृद्धी आणि पुण्याचा विकास करण्याचा माझा संकल्प आहे. पुणे विमानतळावरील नवीन एकात्मिक टर्मिनलचे काम पूर्ण झाले आहे. दोन ते तीन आठवड्यात नियोजन करून टर्मिनलचे उद्घाटन केले जाईल. दुसऱ्या विमानतळाबाबत राज्य सरकारशी चर्चा करावी.

### विमानतळावर प्रवाशांची संख्या मोठी

» खासदार बारणे म्हणाले की, पुणे, पिंपरी-चिंचवड शहर आणि जिल्हा परिसराची लोकसंख्या दोन कोटीवर पोहोचली आहे. पुणे शैक्षणिक, व्यवसायिक, माहिती व तंत्रज्ञाननगरी असून देश-विदेशातून प्रवाशी विमानाने पुण्यात येतात. विमानतळावरून आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत हवाई वाहतूक सुरू आहे. विमानतळावर प्रवाशांची संख्या मोठी असून हे विमानतळ देशातील दहाव्या क्रमांकाचे आहे. हे विमानतळ भारतीय वायुसेनेचे मुख्य बेस आहे. त्यामुळे वायुसेनेच्या वेळापत्रकानुसार चालविले जाते.

त्यासाठी राज्य सरकाराने जागा पाहणी करून आम्हाला अहवाल पाठवावा, त्यावर आम्ही कार्यवाही केली जाईल. सद्यस्थितीत एका जागेबाबत प्रस्ताव आमच्याकडे आला होता.मात्र, शेतकऱ्यांच्या काही अडचणी आहेत. त्यामुळे जागा पाहून प्रस्ताव पाठविण्याची राज्य सरकारची जबाबदारी आहे. प्रस्ताव आल्यास योग्य कारवाई केली जाईल.असा प्रश्न मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी हिंदीतून लोकसभेत विचारला. त्यावर केंद्रीय हवाई वाहतूक मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांनी मराठीत उत्तर दिले.

## मेट्रो मार्गिकेखाली पिंपरी महापालिका

# लावणार कोट्यवधींचे दिवे!

## » सुशोभीकरणाच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांची उधळण केली जात असल्याने नागरिकांमधून तीव्र नाराजी

| पिंपरी | महाईन्यूज | प्रतिनिधी |

**शहरात पिंपरी ते दापोडी या मार्गावर मेट्रो धावत असून या मार्गिकेखाली महापालिका सुशोभित खांब आणि खांबांवर एक हजार दिवे लावणार आहे. त्यासाठी सहा कोटींचा खर्च करण्यास आयुक्त शेखर सिंह यांनी मान्यता दिली आहे. एकीकडे महापालिकेला विकासकामांसाठी कर्ज काढण्याची वेळ आली असताना सुशोभीकरणाच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांची उधळण केली जात असल्याने नागरिकांमधून तीव्र नाराजी व्यक्त होऊ लागली आहे.**



महामेट्रोने चिंचवडचा मदर टेरेसा उड्डाणपूल ते दापोडीच्या हॅरिस पुलापर्यंत मेट्रोची मार्गिका उभारली आहे. या मार्गात ३२२ खांब आहेत. हे काम करताना महामेट्रोने महापालिकेने दुभाजकावर लावलेले दिव्याचे खांब काढून टाकले. आता मार्गिकेखाली महापालिका दिव्यांचे खांब बसवून सुशोभीकरण करणार आहे. त्यासाठी महापालिकेच्या विद्युत विभागाने सात कोटी ९४



लाख २८ हजार ४६८ खर्चाची निविदा काढली होती. त्यात पाच ठेकेदारांनी सहभाग घेतला. त्यातील दोन ठेकेदार पात्र ठरले. त्यात लेक्सा लायटिंग टेक्नॉलॉजीची २५.०२ टक्के कमी दराची निविदा पात्र ठरली आहे. त्यांनी सादर केलेला पाच कोटी ९५ लाख ५५ हजारांचा दर योग्य, वाजवी असल्याने निविदा स्वीकारण्यास आणि त्यांच्यासोबत करारनामा करण्यास आयुक्तांनी मान्यता दिली.

### महापालिकेच्या निधीतून महामेट्रोचे काम

» मेट्रो मार्गिकेचे काम पूर्ण झाल्यानंतर रस्ते पूर्ववत करून सुशोभीकरण करण्याचा दावा महामेट्रोने केला होता. दुभाजकात रोपे लावून सुशोभीकरण, सांडपाण्याचा फेरवापर करणार असे अनेक दावे महामेट्रोने केले. मात्र, महामेट्रोच्या कामामुळे दुरवस्था झालेल्या रस्त्यांची डागडुजी महामेट्रोने केलेली नाही. 'मर्ज इन' व 'मर्ज आउट'साठी तयार केलेला नवा मार्ग पूर्ववत केला नाही. दर्जाहीन काम केल्याने अनेक ठिकाणी दुभाजक तुटून पडले आहेत. मेट्रोचे काम महापालिका निधीतून केले जात आहे. महापालिकेच्या विद्युत विभागाचे सह शहर अभियंता संजय खाबडे म्हणाले की, मेट्रो मार्गिकेखाली सुशोभित दिवे लावण्यात येणार आहेत. हे दिवे 'डीएमएस' प्रकाराचे आहेत. विशिष्ट दिवसानुसार वेगवेगळी प्रकाश व्यवस्था करता येणार आहे. त्यामुळे मार्ग अधिक आकर्षक दिसणार आहे. संबंधित संस्था पाच वर्षे दिव्यांची देखभाल करणार आहे.

---

## पवना नदीवरील समांतर पुलाचे काम संथगतीने!

### » ठेकेदाराला दिवसाला पाच हजारांचा दंड, एप्रिलअखेरपर्यंत काम पूर्ण करण्याची आयुक्तांची तंबी

| मुंबई |

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**पिंपरी व पिंपळे सौदागर या गावांना जोडणाऱ्या पवना नदीवरील समांतर पुलाचे काम अतिशय संथगतीने सुरू आहे. पुलाच्या कामाची मुदत संपून वर्ष उलटल्यानंतरही काम अपूर्णच आहे. त्यामुळे ठेकेदाराला दिवसाला पाच हजारांचा दंड आकारण्यात येत आहे. आयुक्त शेखर सिंह यांनी कामाची पाहणी करून ठेकेदाराला एप्रिलअखेरपर्यंत काम पूर्ण करण्याची तंबी दिली आहे.**



सुमारे १०० मीटर लांबीचा आणि आठ मीटर रुंदीचा हा समांतर पूल आहे, तर तीन मीटरचा पदपथ आहे. त्यासाठी १३ कोटींचा खर्च अपेक्षित आहे. जुन्या पुलावरून दिवसभर ये-जा करणाऱ्या वाहनांची मोठी वर्दळ असते. सध्याचा पूल अरुंद असल्याने तेथे वारंवार वाहतूककोंडी होत आहे. नव्या पुलाचे काम लवकरात लवकर पूर्ण करून तो वाहतुकीस खुला करावा, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

कामाची मुदत दीड वर्षाची होती. जून २०२२ ला ती संपली आहे. त्यानंतरही काम संथ गतीने सुरू असल्याने महापालिकेच्या स्थापत्य प्रकल्प विभागाने ठेकेदार व्ही. एम. मोतेरे कंपनीला महागाई भाववाढ देणे बंद केले. सहा महिन्यांची मुदतवाढ देत दररोज एक हजार रुपये दंड लावला होता. आता ती मुदतही संपल्याने दररोज पाच हजार रुपये दंड लावला आहे. तरीही काम वेगात होत नसल्याने आयुक्त सिंह यांनी अधिकाऱ्यांसमवेत पुलाच्या कामाची पाहणी केली. ठेकेदाराला सक्त सूचना करीत एप्रिलपर्यंत काम पूर्ण करण्याची तंबी दिली आहे.

### फेब्रुवारीअखेरपर्यंत 'स्लॅब'चे काम पूर्ण होईल

» **वाहतूक नियोजन विभागाचे कार्यकारी अधिकारी बापूसाहेब गायकवाड म्हणाले की, ठेकेदाराला एप्रिल २०२४ पर्यंत कोणत्याही परिस्थितीत काम पूर्ण करण्याचा सूचना दिल्या आहेत. कामाला गती मिळाली आहे. फेब्रुवारीअखेरपर्यंत पुलाच्या 'स्लॅब'चे काम पूर्ण होईल.**




**लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहण्यासाठी आईवडिलांची नव्हे, तर संबंधित क्षेत्रातल्या नोंदणी अधिकाऱ्याची लेखी परवानगी बंधनकारक करण्याचा नवा विनोद उत्तराखंड सरकारने त्या राज्यापुरत्या समान नागरी कायद्याचे विधेयक मांडताना केला आहे.**

तो एवढ्यापुरताच मर्यादित नाही तर अशा नातेसंबंधांची नोंदणी महिनाभरात केली नाही तर संबंधित जोडप्याला तीन

# ‘काजी’सुद्धा असायला पाहिजे राजी?



महिन्यांच्या तुरुंगवासाच्या शिक्षेची तरतूद त्यात करण्यात आली आहे. बहुचर्चित समान नागरी कायद्याचे विधेयक मांडणारे उत्तराखंड हे या निमित्ताने देशामधले पहिले राज्य ठरले आहे. गोव्यात समान नागरी कायदा आहे, पण तो पोर्तुगीज काळापासून. स्वतंत्र भारतात आणू पाहणारे उत्तराखंड हे पहिले राज्य. भारतीय जनता पक्षाच्या देश पातळीवर समान नागरी कायदा आणण्याच्या महत्त्वाकांक्षेची अशी लघुरूपे देश पातळीवर कदाचित या स्वरूपात यापुढच्या काळात दिसतील. तर मुद्दा या विधेयकातील तरतुदींचा. त्यात विवाह, घटस्फोट, वारसाहक्क, लिव्ह इन रिलेशनशिप (लैंगिक संबंध) या मुद्द्यांशी संबंधित तरतुदी आहेत.विवाहाच्या कक्षेत लिव्ह इन रिलेशनशिप आणणे ही खरेतर स्वागतार्ह गोष्ट. कारण लग्नव्यवस्था मान्य नसलेल्या किंवा त्यापलीकडे जाऊन नातेसंबंधांचे नवे पर्याय शोधू पाहणाऱ्या आणि त्यासाठी लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या जोडप्यांची संख्या अलीकडच्या काळात वाढायला लागली आहे.

त्याबरोबरच त्यातून उद्भवणाऱ्या समस्याही अपरिहार्य आहेत. पण मानवी इतिहासातील विवाहसंस्थाच अजून पुरेशी नियमबद्ध करता येत नसेल, तर लिव्ह इन रिलेशनशिप ही काहीशी नवी पद्धत कायदेबद्ध करताना तिच्याकडे इतक्या कठोरपणे पाहण्याची मुळात गरज आहे का? या नातेसंबंधाची महिनाभरात नोंदणी केली नाही, तर तीन महिने तुरुंगवास? आपल्या देशात अजूनही अधिकृत विवाहांची नोंदणी करण्याबाबत पुरेशी जागरूकता आहे, असे म्हणता येणार नाही. मग नातेसंबंधांचे स्वातंत्र्य घेऊ पाहणाऱ्या नातेसंबंधांसाठी हा असा बडगा का? सरकारला असे नातेसंबंध असताच कामा नयेत, असे म्हणायचे असेल तर गोष्ट वेगळी.

ते त्यांनी समिलगी नातेसंबंधांबाबत या विधेयकात अप्रत्यक्षपणे म्हटलेच आहे. पण लिव्ह इन नातेसंबंध चालतील, त्यातून जन्मलेले मूलही वैध असेल, पण या नातेसंबंधांची महिनाभरात सरकारदफ्तरी नोंद केली नाही, तर तो मात्र गुन्हा हे असे कसे असू शकते? आणि संबंधित जोडप्याच्या पालकांची परवानगी वगैरे एकवेळ समजण्यासारखे आहे, पण एखाद्या जोडप्याला एकत्र राहायचे असेल तर त्यासाठी नोंदणी अधिकाऱ्याकडे नोंद करणे म्हणजे एकप्रकारे सरकारची परवानगी घेणेच आले ना? अशी वेगवेगळ्या धर्मामधली किंवा जातींमधली जोडपी परवानगी मागायला गेली तर त्यांना ती मिळणार का? ज्यांना मुळात विवाहसंस्थेमधली बंधने नको आहेत, त्यांना नोंदणीच्या या नव्या बंधनात अडकवण्याचा अट्टहास कशासाठी? आणि सरकारच्या म्हणण्याप्रमाणे नोंदणी अधिकाऱ्याकडे नोंदणी वगैरे करून काही वर्षे या नातेसंबंधात राहिलेल्या जोडप्याला नंतर त्या नातेसंबंधांमधून बाहेर पडायचे असेल तर? आधीची नोंदणी रद्द वगैरे करायची का?समाजाच्या सोयीसाठी, काही गोष्टी चौकटबद्ध करण्यासाठी लग्नसंस्था विकसित होत गेली असली आणि ती आवडो किंवा न आवडो पण बहुतेकांना ती स्वीकारावी लागत असली तरी स्त्रीपुरुष हे चैतन्यशील, रसरशीत आणि सगळ्याच नात्यांच्या मुळाशी असलेले नाते. अनेकदा कोणत्याही चौकटीत बसू न पाहणारे. निसर्गाच्या हाकांना प्रतिसाद देणारे प्रेम हा त्याचा पाया. नंतर त्याला वेगवेगळे मुलामे लावले जात असले तरी एकमेकांची ओढ वाटणाऱ्या दोन जिवांना असोशीने एकत्र रहावेसे वाटणे हा त्याचा गाभा आहे. त्या धडका तुरुंगवासाची वगैरे भीती घालून थोपवता येतील, असे उत्तराखंडच्याच नव्हे, कोणत्याही सरकारला खरेच का वाटत असेल? अशी तरतूद करण्यामागचे अंतस्थ हेतू किंवा अजेंडे अगदीच समजण्यासारखे आहेत.

## संपादकीय »

### आयोगिक अपरिहार्यता

***निवडणूक आयोगाचे कौतुक करावे तितके थोडेच. हा आयोग काय किंवा महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर काय! या दोघांनी जराही अपेक्षाभंग केला नाही.***

निवडणूक आयोगाचे कौतुक करावे तितके थोडेच. हा आयोग काय किंवा महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर काय! या दोघांनी जराही अपेक्षाभंग केला नाही. आयोगाचा आधीचा एकनाथ शिंदे यांची शिवसेना अधिकृत ठरवण्याचा निर्णय असो, नार्वेकरांचा शिवसेना फुटीसंदर्भात सर्वांनाच पात्र ठरवण्याचा निर्णय असो किंवा निवडणूक आयोगाचा अजित पवार यांच्या राष्ट्रवादीस घड्याळ देण्याचा निर्णय असो... सगळे कसे अपेक्षेनुसारच घडले. या दोघांनीही जे काही केले त्यापेक्षा वेगळे काही केले नसते याबाबत कोणाच्याही मनात तिळमात्र शंका नव्हती. तसे काही वेगळे करण्याची संबंधितांची शामत असती तर ते करणारे ज्या ठिकाणी आहेत त्या ठिकाणी असतेच ना. तेव्हा जे काही झाले त्याबाबत अजिबात धक्का, आश्चर्य, खेद इत्यादी काही भावना व्यक्त करण्याची गरज नाही.

**लोक गरिबीतून बाहेर पडण्यासाठी प्रयत्न करत नाहीत, म्हणून भारतात गरिबी आहे असे नाही, तर गरिबीतून बाहेर पडणे त्यांच्या आवाक्याबाहेरचे आहे, म्हणून ते गरीब आहेत. त्यामुळे त्यासाठी सरकारी प्रयत्नच आवश्यक आहेत. वित्तीय वर्ष २०२४-२५ साठीचा अंतरिम अर्थसंकल्प १ फेब्रुवारीला सादर झाला.**

# आर्थिक वाढ ठीक, पण सामाजिक कल्याण?

साधारण जुलै महिन्यात नवीन सरकार स्थापनेनंतर संपूर्ण अर्थसंकल्प सादर होईल. अंतरिम असला तरी हा अर्थसंकल्प कमी महत्त्वाचा अजिबात नाही. कारण त्यातून सरकारचा अर्थव्यवस्थेच्या विकासाबाबतचा दृष्टिकोन स्पष्ट होतो. शिवाय, हा अर्थसंकल्प होऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मांडण्यात आला असतानाही त्यात लोकप्रिय घोषणा केलेल्या नाहीत. यातून सरकारचा आर्थिक ध्येयधोरणे तुलनेने स्थिर ठेवण्याचा मानस स्पष्ट होतो. याचा असाही अर्थ आहे की हेच सरकार पुन्हा सत्तेत आले तर ते मागील काही वर्षांत जो सरकारचा अर्थव्यवस्थेविषयक दृष्टिकोन आहे त्यानुसार काम करेल असे मानण्यास वाव आहे. त्यामुळे अंतरिम असला तरी या अर्थसंकल्पातील सरकारी व्ययाच्या अनुषंगाने विषमता, गरिबी आणि वंचितता यांच्या निर्मूलनाविषयी विवेचन करणे प्रासंगिक आहे. बाजाराधारित अर्थव्यवस्थांमध्ये सरकारी खर्चाचे



एकूण अर्थव्यवस्थेतील योगदान आणि त्या खर्चाचे अर्थव्यवस्थेवर होणारे परिणाम खासगी क्षेत्रामार्फत होणाऱ्या खर्चाच्या तुलनेत मर्यादित असू शकतात. या वर्षी केंद्र सरकारचा एकूण खर्च अंदाजे ४७.७ लाख कोटी रुपये आहे. भारतात गेल्या तीन दशकांत केंद्र सरकारच्या एकूण खर्चाचे जीडीपीशी प्रमाण १५% राहिले आहे. पण सूक्ष्म अर्थशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिल्यास सरकारमार्फत होणाऱ्या खर्चाचे परिणाम संपूर्ण अर्थव्यवस्थेवर एकसमान न होता विविध घटकांवर वेगवेगळे होतात. शिवाय सरकारी खर्च नियोजनबद्ध पद्धतीने आणि नेमकेपणाने करून अपेक्षित परिणाम घडवून आणले जाऊ शकतात. त्यामुळे कल्याणकारी खर्चाच्या माध्यमातून अर्थव्यवस्थेतील अल्प उत्पन्न असलेल्या घटकांच्या परिस्थितीत अनुकूल बदल घडू शकतात. भारतात गरिबीचे मोजमाप पारंपरिक पद्धतीने उपभोग खर्चावर आधारित हेडकॉऊंट रेशो वापरून केले गेले आहे. गेल्या दशकात मात्र दारिद्र्य मोजण्याच्या पद्धतींवर झालेल्या समीक्षेमुळे बहुआयामी गरिबी निर्देशांक (मल्टि-डायमेंशनल पॉवर्टी इंडेक्स) वापरला जाऊ लागला व गरिबीच्या मोजमापात केवळ उपभोग खर्चच नाही तर आरोग्य, शिक्षण आणि राहणीमानाशी संबंधित घटक जसे की स्वच्छता, पिण्याचे पाणी, घर, वीज आणि स्वयंपाकासाठीचे इंधन यांचा समावेश केला गेला. गरिबी मोजण्याच्या या दोन्ही पद्धतींनुसार गेल्या दोन दशकांत गरिबी कमी झाली आहे. अधिक व्यापक आणि संबद्ध असलेल्या बहुआयामी गरिबी निर्देशांकाचे आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने (आयएमएफ) केलेल्या मोजमापानुसार भारतात २०१५-१६ साली २५ टक्के इतके लोक गरीब होते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मंत्रालयात बसलेली टोळी गुंडांची!

## एकनाथ शिंदे , श्रीकांत यांच्याविरोधात आदित्य ठाकरे आक्रमक

। मुंबई । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**महाराष्ट्रात जी परिस्थिती झाली आहे तेव्हा वाटलं की खोके सरकार आहे. धोके सरकार आहे, पण चिंधीचोर सरकारही भाजपाने डोक्यावर बसवलं आहे अशी बोचरी टीका आदित्य ठाकरेंनी कल्याणमध्ये केली. गद्दार आणि चोरांच्या सरकारमध्ये गुंडाराज आहे. काल-परवाकडे गणपत गायकवाड यांनी गोळीबार केला.**



ती घटना तुम्ही पाहिली असेलच भाजपाच्या आमदाराने पोलीस ठाण्यात गोळीबार केला. नंतर टीव्हीवर येऊन गायकवाड यांनी सांगितलं. मुख्यमंत्र्यांवर जे आरोप केले ते पण सगळ्यांना माहीत आहे. चिंधीचोर आणि गुंडांचं राज्य उलथवून लावा हे आवाहन करायला मी कल्याणमध्ये आलो आहे असं आदित्य ठाकरे म्हणाले. एकनाथ शिंदेंचं नावच मिंधे आणि गद्दार झालंय. पण जे काही घडतंय त्यात बदनामी महाराष्ट्राची होते आहे. दोन पक्ष चोरलेले आणि एक भाजपा हे काय करत आहेत? गुंडांची भेट घेत आहेत. गुंड मंत्रालयात जात आहेत. गुंड रिल्स तयार करत आहेत. आपण जनता म्हणून शांत किती दिवस बसायचं? घटनाबाह्य मुख्यमंत्र्यांचे होर्डिंग पाहिले आहेत. आपले होर्डिंग काढावे लागतात. मग गद्दारांचे होर्डिंग कसे चालतात? असा प्रश्नही आदित्य ठाकरेंनी विचारला. महाराष्ट्रात जे वातावरण आहे, मी पाहिलं सगळीकडे मिंध्यांचे बॅनर आहेत. हे सगळं किती योग्य आहे? चिंधीचोरांना, गुंडांना हे बॅनर लावायला सांगतात. हे पैसे येतात कुठून हे ईडी विचारणार आहे का? कायदा आहे तरी कुठे? हा प्रश्न आम्हाला पडला आहे. आम्ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानासाठी लढतोय. मी मागची दोन वर्षे पाहतोय महाराष्ट्रात उद्योजकांना हैराण केलं जातं आहे. इथे येणारे प्रकल्प गुजरातला पाठवले जात आहेत.या सरकारविरोधात आवाज उठवण्याचा प्रयत्न केला की चिंधीचोर आणि गुंड त्यांच्या घरी पाठवले जात आहेत. अभिषेक घोसाळकर यांच्यावर गोळीबार झालाय. पाच वाजता आम्ही बोललो. त्यानंतर ही घटना घडली. हे होत असताना आपण गप्प बसायचं का? कोल्हापूरचा एक व्हिडीओ आलाय हात जोडून विनंती करते आहे मला मारु नका, मात्र घरात जाऊन मुलीला, महिलेला मारलं जातं. कारवाई होत नाही. मुंबईतल्या माहीममध्ये एका गद्दार आमदाराने गणपतीच्या मिरवणुकीत बंदूक काढली होती. गद्दार आम्हाला शिव्या देतात ते बरं वाटतं. त्या आमदाराने पोलीस ठाण्यात फायरिंग केलं. त्याचा अहवाल तयार आहे पण सादर झालेला नाही. हे सरकार हिंदुत्व शिकवतं आहे. पोलीस ठाण्यात फायरिंग केलं तर UAPA कायदान्वये कारवाई का झाली नाही? या निर्लज्ज सरकारने सिद्धिविनायक ट्रस्टचं अध्यक्ष त्या आमदारांन केलंय. यांचं हिंदुत्व रावणाचं आहे आणि आपलं रामाचं हिंदुत्व आहे. कोण बंदूक काढतंय, गोळीबार करतंय कुणाला अटक होत नाही. मात्र मंत्रालयातली टोळी आपल्या राज्याला बदनाम करते आहे. असाही आरोप आदित्य ठाकरेंनी केला.ठाकरे गटाचे माजी नगरसेवक अभिषेक घोसाळकर यांच्यावर दहीसर येथे गोळीबार झाल्याची धक्कादायक घटना समोर येत आहे.

### कायदा आहे तरी कुठे हा प्रश्न ?

» उल्हासनगर येथील गणपत गायकवाड गोळीबार प्रकरण शांत होत नाही तोवर ही घटना घडल्याने राज्यातील कायदा सुव्यवस्थेवरून पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे. याप्रकरणी ठाकरे गटाचे माजी नगरसेवक बाळकृष्ण ब्रीद यांनी टीव्ही ९ मराठीशी संवाद साधताना माहिती दिली. अभिषेक घोसाळकर हे शिवसेनेचे माजी आमदार विनोद घोसाळकर यांचे पुत्र आहेत.ती घटना तुम्ही पाहिली असेलच भाजपाच्या आमदाराने पोलीस ठाण्यात गोळीबार केला. नंतर टीव्हीवर येऊन गायकवाड यांनी सांगितलं. मुख्यमंत्र्यांवर जे आरोप केले ते पण सगळ्यांना माहीत आहे. चिंधीचोर आणि गुंडांचं राज्य उलथवून लावा हे आवाहन करायला मी कल्याणमध्ये आलो आहे असं आदित्य ठाकरे म्हणाले.एकनाथ शिंदेंचं नावच मिंधे आणि गद्दार झालंय. पण जे काही घडतंय त्यात बदनामी महाराष्ट्राची होते आहे. दोन पक्ष चोरलेले आणि एक भाजपा हे काय करत आहेत? गुंडांची भेट घेत आहेत. गुंड मंत्रालयात जात आहेत. गुंड रिल्स तयार करत आहेत. आपण जनता म्हणून शांत किती दिवस बसायचं? घटनाबाह्य मुख्यमंत्र्यांचे होर्डिंग पाहिले आहेत. आपले होर्डिंग काढावे लागतात. मग गद्दारांचे होर्डिंग कसे चालतात? असा प्रश्नही आदित्य ठाकरेंनी विचारला. महाराष्ट्रात जे वातावरण आहे, मी पाहिलं सगळीकडे मिंध्यांचे बॅनर आहेत. हे सगळं किती योग्य आहे? चिंधीचोरांना, गुंडांना हे बॅनर लावायला सांगतात. हे पैसे येतात कुठून हे ईडी विचारणार आहे का? कायदा आहे तरी कुठे? हा प्रश्न आम्हाला पडला आहे.

# खोके म्हणणाऱ्यांनीच मंत्रिपदासाठी पैसे मागितले : केसरकर

## शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांचे उद्धव ठाकरेंवर गंभीर आरोप

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्याचे शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी एक खळबळजनक दावा केला आहे. शिवसेनेत (एकत्रित) असताना मंत्रिपदासाठी पैसे द्यावे लागत होते. माझ्याकडे तेवढे पैसे नसल्यामुळे मला मंत्रिपद मिळाले नाही, असा गौप्यस्फोट केसरकर यांनी माध्यमांशी बोलताना केला. उद्धव ठाकरे यांनी नुकताच सिंधुदुर्ग जिल्ह्याचा दौरा केला होता. यावेळी सावंतवाडीचे आमदार दीपक केसरकर यांच्यावर त्यांनी जोरदार टीका केली होती.**

या टीकेनंतर व्यथित झालेल्या दीपक केसरकर यांनी एकत्रित शिवसेनेत असताना पक्षाला एक कोटींचा धनादेश दिला असल्याचे जाहीर केले. कोट्यवधीचा निधी देऊनही मंत्रिपदासाठी आवश्यक असलेला निधी देऊ शकलो नाही, असेही दीपक केसरकर यांनी सांगितले होते.आज मुंबईत माध्यमांशी बोलत असताना दीपक केसरकर यांनी या विषयावर अधिक भाष्य केलं. ते म्हणाले, "राजकारणात पक्ष चालविण्यासाठी पैसे लागतात. त्यासाठी देणगी द्यावी लागते. पण मंत्रिपदासाठी आम्ही पैसे कुठून देणार? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. आम्ही आमच्या



जागा विकून पक्षाला निधी देत होतो. पण मंत्रिपदासाठी मला पैसे देता आले नाहीत. त्याचे कधीही वाईट वाटले नाही."दीपक केसरकर पुढे म्हणाले, "पैसे देऊन मंत्रिपद घेणं, हा काही उद्देश असू शकत नाही. मंत्रिपद हे सामान्यांच्या सेवेसाठी असतं. जे लोक खोके, खोके ओरडत आहेत, त्यांनी एक गोष्ट ध्यानात घ्यावी की, आमच्यापैकी कुणीही पैसे घेतले नाहीत. आम्हाला मंत्रीपद देताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आमच्याकडून एक रुपयाही घेतला नाही. पण आमचे आधीचे नेते मंत्रिपदासाठी पैसे मागत होते, ही वस्तूस्थिती आहे. त्यामुळे खोके कोण गोळा करत होतं? हे लोकांनी समजून घ्यावं", असा खळबळजनक आरोप राज्याचे शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी केला आहे. यावेळी केसरकर यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर नाव न घेता टीकास्र सोडले.आम्ही आमची श्रीमंती सोडून राजकारणात आलो, ते गरिबांची सेवा करण्यासाठी.

### सत्तेपोटी तुम्ही तत्त्व सोडत आहात

» उद्धव ठाकरे सावंतवाडीमध्ये येऊन माझ्याबद्दल काही बोलले, ते आमच्या जनतेला पटलेलं नाही. आमचं आयुष्य इथल्या जनतेसाठी गेलं आहे. मी पूर्वीपासून याठिकाणी आमदार होतो, उद्धव ठाकरेंनी मला आमदार केलेलं नाही. उलट माझ्या लढाईमुळे शिवसेनेचा एक खासदार आणि एक आमदार निवडून आला. एकाएकी शिवसेनेची एक लाख मतं वाढली. आम्ही बाळासाहेब ठाकरेंच्या विचारांसाठी शिवसेनेत आलो होतो. पण ते सोडून उद्धव ठाकरे काँग्रेस बरोबर गेले. मग तुम्ही मराठी माणसाचे हित कसे साधणार? हिंदुत्वाचा सन्मान कसा राखणार? काँग्रेसचे नेते राहुल गांधी पदोपदी स्वा. सावरकरांचा अवमान करतात. त्यांना तुम्ही मिठी मारणार असाल तर आम्हाला हे मान्य नाही. सत्तेपोटी तुम्ही तत्त्व सोडत आहात", अशी टीका केसरकर यांनी केली.

# मोदींचं 400 जागांचं स्वप्न भंगणार?

## आघाडीला किती जागा : एनडीए 400 पार करू शकणार नाही

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**आगामी लोकसभा निवडणुकीत कोण बाजी मारणार? पुन्हा भाजपा सरकार सत्तेवर येणार की नव्याने स्थापन झालेल्या इंडिया आघाडीला सत्तेची खुर्ची मिळणार? कोणाच्या किती जागा निवडून येणार? राज्या-राज्यात कोणाच्या बाजूने लोकांचा कौल आहे आदी विविध विषयांवर गेल्या काही दिवसांपासून चर्चा चालू आहे. या चर्चांमध्ये आता अनेक माध्यमांचे अंदाज समोर येऊ लागले आहेत. इंडिया टुडे मूड ऑफ नेशनचा अंदाज आता समोर आला असून त्यानुसार कोणाच्या पारड्यात किती जागा मिळणार याचे अंदाज बांधण्यात आले आहेत.**



भाजपाच्या नेतृत्त्वाखाली राष्ट्रीय लोकशाही आघाडी म्हणजेच NDA ला पुन्हा एकदा सत्ता काबीज करण्यात यश येणार आहे. परंतु, यंदाच्या निवडणुकीत एनडीए ४०० पार करू शकणार नाही, असं अंदाजात वर्तवण्यात आलं आहे.आज लोकसभेच्या निवडणुका झाल्या तर, भाजपच्या नेतृत्वाखालील NDA ३३५ जागा जिंकू शकेल. सरकार स्थापनेसाठी २७२ जागांची आवश्यकता आहे. त्यामुळे भाजपा आरामात सत्ता स्थापन करू शकेल. परंतु, एनडीए या निवडणुकीत १८ जागांवर अपयशी होऊ शकते, याचा फायदा इंडिया आघाडीला होणार असल्याचंही सर्वेतून समोर आलं आहे.आगामी लोकसभा निवडणूक NDA विरूद्ध INDIA आघाडी अशी होणार आहे. त्यामुळे एनडीएला ३३५ जागा मिळणार असून इंडिया आघाडीला १६६ जागांवर समाधान मानावं लागणार असल्याची चिन्हे आहेत. पक्षनिहाय विचार केल्यास भाजपाला ५४३ जागांपैकी ३०४ जागांवर विजय मिळण्याची शक्यता आहे. तर, काँग्रेसला ७१ जागा मिळण्याची शक्यता आहे. तर उर्वरित १६९ जागांवर स्थानिक पक्ष आणि अपक्ष उमेदवार निवडून येण्याची शक्यता आहे.दिल्लीतील सत्तेचा मार्ग उत्तर प्रदेशातूनजातो असं नेहमी म्हटलं जातं. त्याच कारण म्हणजे उत्तर प्रदेशमध्ये लोकसभेच्या 80 जागा आहेत. त्याचपार्श्वभूमीवर इंडिया टुडे ग्रुपनं सर्वेक्षण केलेय. इंडिया टुडे आणि सी वोटर यांनी देशातील 543 लोकसभा मतदारसंघात सर्वेक्षण केलेय. लोकसभा निवडणुकीआधी करण्यात आलेल्या सर्व्हेक्षणानुसार, उत्तरप्रदेशमध्ये भाजपला फायदा झाल्याचे दिसतेय. 2019 च्या लोकसभा निवडणुकीपेक्षा यंदा 2.13 टक्के मतं जास्त मिळतील असा अंदाज वर्तवण्यात आलाय. सर्व्हेनुसार, उत्तरप्रदेशमध्ये भाजपला 80 पैकी 70 जागांवर यश मिळेल. भाजपला उत्तरप्रदेशमध्ये यंदा 52.1 टक्के मते मिळतील. गेल्या निवडणुकीच्या तुलनेत उत्तर प्रदेशमध्ये भाजपच्या 8 जागा वाढण्याची शक्यता आहे. काँग्रेस आणि सपा यांना उत्तर प्रदेशमध्ये 35 टक्केंपेक्षा कमी मते मिळू शकतात. तर बसपाला स्वबळाचा फटका बसण्याची शक्यता आहे. मतांची टक्केवारीही घटण्याची शक्यता आहे.मागील दीड महिन्यात (15 डिसेंबर 2023 ते 28 जानेवारी 2024) हा सर्व्हे केला आहे. 35 हजार लोकांसोबत चर्चा केली तर वेगवेगळ्या पद्धतीने दीड लाख लोकांसोबत सर्व्हे केलाय. जर आज देशात लोकसभा निवडणूक झाली तर कुणाला किती जागा मिळतील ? असा प्रश्न सर्व्हेत विचारण्यात आला. भाजपवा 370 जागा मिळतील का ? पंतप्रधान नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान होतील का ? जनतेमध्ये सर्वात लोकप्रिय कोण आहे? यासारख्या प्रश्नांची उत्तरे जाणून घेण्याचा प्रयत्न सर्व्हेच्या माध्यमातून केला. उत्तर प्रदेशमध्ये भाजपला यंदा तगडा फायदा मिळण्याची शक्यता आहे. सर्व्हेनुसार, उत्तर प्रदेशमध्ये भाजपला 52.1 टक्के मते मिळू शकतात. 2019 च्या तुलनेत मतांची टक्केवारी वाढणार आहे. 2019 मध्ये भाजपला उत्तर प्रदेशमध्ये 49.97 टक्के मतं मिळाली होती. आगामी लोकसभा निवडणुकीत उत्तर प्रदेशमध्ये भाजपचा दबदबा दिसतोय. भाजपला 80 पैकी 70 जागा मिळण्याची शक्यता आहे. तर अपना दल पक्षाला दोन जागा मिळू शकतात. म्हणजेच, 80 पैकी एनडीएला 72 जागा मिळू शकतात. समाजवादी पार्टी पक्षाला सात जागा मिळतील. काँग्रेसला फक्त एका जागेवार समाधान मानावे लागेल. गतवेळच्या तुलनेत सपाला दोन जागाचा फायदा होईल. यावेळच्या निवडणुकीत बसपाला एकही जागा मिळणार नसल्याचे सर्व्हेतून स्पष्ट झालेय. 2019 च्या तुलनेत उत्तर प्रदेशमध्ये काँग्रेसच्या मतांची टक्केवारी घसरल्याचे दिसतेय. काँग्रेसला एक टक्केही मते मिळण्याची शक्यता नाही. 2019 मध्ये काँग्रेसला 6.36 टक्के मते मिळाली होती.

### सपाच्या मतांमध्ये वाढ

यावेळच्या लोकसभा निवडणुकीत समाजवादी पार्टी पक्षाच्या मतांमध्ये मोठी वाढ होण्याची शक्यता आहे. सपाला या लोकसभा निवडणुकीत 30.10 टक्के मते मिळू शकतात. सपाला 11.99 टक्के मतांचा फायदा होईल. 2019 मध्ये सपाला 18.11 टक्के मते मिळाली होती. दुसरीकडे बसपाच्या मतांमध्ये घट झाल्याचे दिसतेय. बसपाला यंदा 8.4 टक्के मते मिळतील. 2019 मध्ये त्यांना 19.4 टक्के मते मिळाली होती. लोकसभा निवडणुकीआधी करण्यात आलेल्या सर्व्हेक्षणानुसार, उत्तरप्रदेशमध्ये भाजपला फायदा झाल्याचे दिसतेय. 2019 च्या लोकसभा निवडणुकीपेक्षा यंदा 2.13 टक्के मतं जास्त मिळतील असा अंदाज वर्तवण्यात आलाय. सर्व्हेनुसार, उत्तरप्रदेशमध्ये भाजपला 80 पैकी 70 जागांवर यश मिळेल. भाजपला उत्तरप्रदेशमध्ये यंदा 52.1 टक्के मते मिळतील. गेल्या निवडणुकीच्या तुलनेत उत्तर प्रदेशमध्ये भाजपच्या 8 जागा वाढण्याची शक्यता आहे. काँग्रेस आणि सपा यांना उत्तर प्रदेशमध्ये 35 टक्केंपेक्षा कमी मते मिळू शकतात. तर बसपाला स्वबळाचा फटका बसण्याची शक्यता आहे. मतांची टक्केवारीही घटण्याची शक्यता आहे. मागील दीड महिन्यात हा सर्व्हे केला आहे. 35 हजार लोकांसोबत चर्चा केली तर वेगवेगळ्या पद्धतीने दीड लाख लोकांसोबत सर्व्हे केलाय.


# इंडिया आघाडीला महाराष्ट्रात ४८ पैकी २६ जागा मिळणार

## काही सर्व्हे महायुतीला तर काही सर्व्हे इंडिया आघाडीच्या बाजूने कौल

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**लोकसभा निवडणुकीला अवघे काही महिने उरले असताना देशातील विविध संस्थांच्या माध्यमातून लोकसभा निवडणुकीच्या निकालाचा अंदाज बांधणारे सर्वे समोर येत आहेत. काल टाइम्स नाऊचा सर्वे समोर आला होता. आज 'इंडिया टुडे मूड ऑफ नेशन'चा सर्वे समोर आला आहे.**



या सर्व्हेतून इंडिया आघाडीच्या पारड्यात महायुतीपेक्षा अधिक जागा दाखविल्या आहेत. महाराष्ट्रातील ४८ पैकी २६ जागांवर इंडिया आघाडी मुसंडी मारेल, असे सांगण्यात आले आहे. याबद्दल इतर सर्व्हे काय सांगतात, त्याची आकडेवारी पाहू. इंडिया टुडेचा 'द मूड ऑफ द नेशन्स फेब्रुवारी २०२४' हा सर्व्हे सर्व लोकसभेतील ३५,८०१ प्रतिसादकर्त्यांच्या आधारावर बेतलेला आहे. १५ डिसेंबर २०२३ ते २८ जानेवारी २०२४ या काळात हे सर्वेक्षण केले गेले. इंडिया आघाडीला २६ जागा मिळतील असा अंदाज व्यक्त करत असताना भाजपा आणि एनडीए आघाडीला २२ जागा मिळू शकतील, असे भाकीत वर्तविण्यात आले आहे.इंडिया आघाडीतील घटक पक्षांच्या कामगिरीवर नजर टाकली असताना काँग्रेस पक्षाला चांगला पाठिंबा मिळत असल्याचा दावा सर्व्हेच्या माध्यमातून करण्यात आला आहे. महाराष्ट्रात काँग्रेसला १२ जागा मिळतील, असे दाखविण्यात आले आहे. विशेष म्हणजे मागच्या दोन निवडणुकात काँग्रेसची कामगिरी निराशाजनक राहिलेली आहे. २०१४ साली काँग्रेसचे केवळ दोन खासदार निवडून आले होते. तर २०१९ साली बाळू धानोरकर यांच्या रुपाने केवळ एक जागा काँग्रेसला मिळाली होती. शिवसेना उबाठा आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष – शरदचंद्र पवार यांना एकत्रित १४ जागा मिळतील असे सर्व्हेच्या माध्यमातून सांगण्यात आले. मतदानाच्या टक्केवारीवर नजर टाकली असता इंडिया आघाडीला ४५ टक्के तर एनडीएला ४० टक्के मतदान मिळेल .

### एनडीए 400 हून अधिका जागा

दुसरीकडे टाइम्स नाऊ मॅट्रीज या वृत्तसंस्थेचाही सर्व्हे समोर आला आहे. ज्यामध्ये एनडीएला ३९ तर इंडिया आघाडीला केवळ ९ जागा मिळतील, असा अंदाज मिळतील असा अंदाज वर्तविण्यात आला आहे. दरम्यान मॅट्रीजच्या सर्व्हेबाबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावर ते म्हणाले, सर्व्हे काहीही आले तरी लोकांची मानसिकता मोदींना पाठिंबा देण्याची बनली आहे. लोकांनी ठरवलं आहे की, मोदींना पुन्हा पंतप्रधान बनवायचं. आणि त्यांना पाठिंबा देणाऱ्या प्रत्येकाला जनता निवडून देईल. गतवेळेपेक्षा आमच्या अधिक जागा निवडून येतील.भाजपा ५१ टक्के मतदान घेऊन ३७० जागा मिळवेल तर एनडीए आघाडी एकत्रितपणे ४०० हून अधिका जागा घेईल.

# मिथुन चक्रवर्ती यांचा मुलगा नमाशीचं विधान चर्चेत

गेल्या दोन चार वर्षांपासून बॉलिवूडमध्ये घराणेशाही (नेपोटीजम) बद्दल झालेल्या बऱ्याच चर्चा आपल्या कानावर पडल्या असतील. यावर सर्वच स्तरातून भाष्य होत असतं. अगदी आजच्या काळातील नेपोकिडसवर तर लोक सडकून टीका करताना आपल्याला पाहायला मिळतात. पण सगळ्याच बड्या स्टार्सच्या मुलांच्या नशिबात स्टार होणं नसतं. काही कलाकारांची मुलं ही पुरेसं पाठबळ, आई-बापाची पुण्याई व चांगल्या ओळखी असूनही मागे पडतात त्यापैकी एक नाव म्हणजे नमाशी चक्रवर्ती.नमाशी चक्रवर्ती हा मिथुन चक्रवर्ती यांचा मुलगा. स्टारकीड जरी असला तरी समोरच्या व्यक्तीमध्ये कुवत असणं हेदेखील तितकंच आवश्यक असतं.
नमाशीच्यामागेही मिथुन चक्रवर्ती सारख्या दिग्गज कलाकाराचं नाव जोडलेलं आहे तरी प्रेक्षकांनी त्याला साफ नाकारलं. नुकत्याच एका मुलाखतीमध्ये या क्षेत्रात कराव्या लागणाऱ्या संघर्षाबद्दल, घराणेशाहीबद्दल, पापाराझी कल्चरबद्दल भाष्य केलं आहे.
याविषयी बोलताना नमाशीने सोशल मीडियावर कायम चर्चेत असणाऱ्या ओरीवरही भाष्य केलं आहे.
पापाराझी कल्चरपासून नमाशी का दूर आहे, त्यांच्याबरोबर फोटो काढणं त्याला का पसंत नाही याविषयी नमाशीने 'बॉलिवूड ठिकाना'ला दिलेल्या मुलाखतीमध्ये भाष्य केलं आहे. तो म्हणाला, "जवळजवळ महिनाभर मी ते कल्चर फॉलो करायचा प्रयत्न केला. मी भाड्यावर काही कपडे आणायचो अन् ते परिधान करून पोझिंगसाठी तयार राहायचो.मी ते करणं बंद केलं.

# सेनॉनने सांगितली स्ट्रगलतील आठवण

हिंदी चित्रपटसृष्टीत कोणाचाही पाठिंबा नसताना स्वतःचं वेगळं स्थान निर्माण करणं आणि प्रेक्षकांच्या मनावर वर्षानुवर्षे राज्य करणं हे प्रत्येकालाच जमतं असं नाही. बॉलिवूडमधील अभिनेत्रींसाठी तर हे अधिक कठीण असतं. महिला केंद्रस्थानी असणारे चित्रपट सध्या बनत असले तरी त्यांची संख्या फार कमी आहे. बऱ्याचदा मुख्य प्रवाहातील चित्रपटात नायक हाच केंद्रस्थानी असतो अन् नायिकेची भूमिका ही यथातथाच असतात. याच गोष्टींना छेद देत काही अभिनेत्रींनी स्वतःचं वेगळं स्थान निर्माण करण्यात यश आलं. त्यापैकीच एक गुणी अभिनेत्री म्हणजे क्रीती सेनॉन.क्रीती सेनॉन ही गेल्या काही दिवसांपासून चांगलीच चर्चेत आहे. एकापाठोपाठ एक क्रीतीने बिग बजेट आणि सुपरहीट असे चित्रपट दिले आहेत. 'दिलवाले', 'मीमी', 'भेडीया', 'बच्चन पांडे', 'गणपत', 'शहजादा' अशा बिग बजेट चित्रपटात क्रीती टॉपच्या स्टार्सबरोबर झळकली तर 'मीमी'सारख्या चित्रपटातून तिच्या अदाकारीचीही खूप प्रशंसा झाली. आज कित्येक तरुणांच्या मनावर राज्य करणाऱ्या क्रीतीलादेखील याआधी अत्यंत खडतर दिवस पहावे लागले होते. तब्बल १५ महीने क्रीतीकडे कोणतेही काम नव्हते, या स्ट्रगलबद्दल नुकतंच क्रीतीने एका मुलाखतीदरम्यान खुलासा केला आहे.

# यामी होणार आई



यामी गौतम हिंदी तसेच दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री आहे. जाहिरातीतून प्रसिद्धीझोतात आलेल्या या अभिनेत्रीने अनेक चित्रपटांत महत्त्वाच्या भूमिका साकारल्या आहेत. यामी लवकरच गुड न्यूज देणार असल्याची माहिती समोर आली आहे. अभिनेत्री यामी गौतमचा पती आणि चित्रपट निर्माता आदित्य धर याने 'आर्टिकल ३७०' चित्रपटाच्या ट्रेलर लॉंच कार्यक्रमात यामी लवकरच आई होणार असल्याची बातमी दिली. यामी पाच महिन्यांची गर्भवती असल्याचे या जोडप्याने सांगितले.आदित्य धर याने आपल्या भावना व्यक्त करत सांगितले, "आमचं बाळ लवकरच या जगात येणार आहे. जेव्हा हा चित्रपट तयार झाला आणि आम्हाला ही गोड बातमी कळाली, तेव्हा तो काळ आमच्यासाठी अविस्मरणीय होता. हा क्षण आम्हाला अभिमन्यूसारखा वाटत आहे. ज्याप्रकारे अभिमन्यूने आईच्या गर्भातच सगळं अनुभवलं होतं तसंच 'आर्टिकल ३७०' हा चित्रपट कसा तयार झाला हे बाळाला माहीत असणार आहे आणि या विचारानेच मी खूप भारावून गेलो आहे. ती लक्ष्मी आहे की गणेश हे आम्हाला अजून ठाऊक नाही."यामी गौतमनेही गरोदरपणाचा प्रवास आणि शूटिंगचा अनुभव याविषयीचे तिचे विचार शेअर केले. मानसिकदृष्ट्या ती थोडी अस्वस्थ होती आणि आई होण्याचा पहिला अनुभव असल्याने सगळ्या गोष्टी तिच्यासाठी खूप विशेष आणि आव्हानात्मक होत्या. यामीच्या प्रत्येक प्रवासात आदित्य नेहमी तिच्यासह असल्याने यामीने कृतज्ञता व्यक्त केली. पती आणि इतरांचा पाठिंबा मिळाल्याने सर्वांचे तिने आभार मानले.

# शॉर्ट कपडे वापरायला परवानगी नव्हती



मनोरंजनसृष्टीतील प्रेम प्रकरणं जितकी चर्चेत असतात त्याहून कित्येक पटीने अधिक सेलिब्रिटीजच्या घटस्फोटाची चर्चा होते. बॉलिवूडमध्ये हा प्रकार आपल्याला वरचेवर पाहायला मिळतो. हेमा मालिनी व धर्मेंद्र यांनी मोठी मुलगी ईशा देओलने पती भरत तख्तानीपासून विभक्त झाल्याचे जाहीर केले. सध्या सोशल मीडियावर त्यांच्या घटस्फोटाची चर्चा रंगत असून त्याविषयी सतत काहीतरी नवनवीन गोष्टी कानावर पडत आहेत.ईशा व भरत यांचं लग्न २९ जून २०१२ रोजी साध्या पद्धतीने इस्कॉन मंदिरात झालं होतं. या जोडप्याला राध्या व मिराया नावाच्या दोन मुली आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून ईशा पती भरत तख्तानीपासून विभक्त झाल्याच्या चर्चा होत होत्या. अखेर दोघांनी दिल्ली टाइम्सला निवेदन देत घटस्फोटावर शिक्कामोर्तब केलंय. लग्नाच्या ११ वर्षांनंतर परस्पर संमतीने वेगळे होत आहोत, असं त्यांनी म्हटलं आहे. आता मात्र आणखी वेगळ्या गोष्टी समोर येऊ लागल्या आहेत. ईशाला तिच्या सासरी घरात बरीच बंधनं होती, तसेच तिला घरात शॉर्ट कपडे परिधान करायलाही परवानगी नव्हती अशा गोष्टी समोर येत आहेत. २०२० साली प्रकाशित झालेल्या 'अम्मा मिया' या आपल्या पुस्तकात खुद्द ईशानेच या गोष्टींचा खुलासा केल्याचं स्पष्ट झालं आहे. लग्नानंतर ईशा अधिक जबाबदार मुलीसारखी वागू लागली हेदेखील तिने तिच्या या पुस्तकात लिहिलं होतं. पुस्तकात ईशाने लिहिलं, "लग्नानंतर नक्कीच माझ्याही आयुष्यात बरेच बदल झाले. जेव्हा मी या कुटुंबात राहायला आले तेव्हा मी माझ्या घरात जशी वावरायचे तसं इथे वावरता येणं शक्य नव्हतं. मला या घरात शॉर्ट कपडे घालायला परवानगी नव्हती." याच पुस्तकात ईशाने तिच्या सासरचं बरंच कौतुकही केलं आहे. ईशाला त्या घरातील सदस्याप्रमाणेच वागणूक मिळाली होती. इतकंच नव्हे तर ईशाला कोणताही पदार्थ बनवता येत नव्हता, त्यावेळी लग्न झाल्यानंतर ईशाच्या सासूने तिला स्वयंपाक यायलाच हवा असं बंधनही तिच्यावर कधीच घातली नाही. ईशाने अशा बऱ्याच गोष्टींचा खुलासा तिच्या या पुस्तकात केला आहे.

# आदिपुरुष'च्या अपयशाबाबत सैफ अलीने सोडले मौन




अभिनेता सैफ अली खान अलीकडच्या अनेक चित्रपटांतील भूमिकांमुळे चर्चेत आहे. बिग बजेट असलेला 'आदिपुरुष' गेल्या वर्षी १६ जूनला प्रदर्शित झाला आणि बॉक्स ऑफिसवर दणक्यात आपटला. 'आदिपुरुष'मधील संवादामुळे हा चित्रपट वादाच्या भोवऱ्यात सापडला होता. या चित्रपटात साउथ स्टार प्रभास, सैफ अली खान, क्रिती सेनॉन हे कलाकार मुख्य भूमिकेत दिसले.६०० कोटी बजेट असलेला हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर अपयशी ठरला. या अपयशाबद्दल आणि प्रेक्षकांच्या प्रतिक्रियांबद्दल लेखक-गीतकार मनोज मुनताशीर शुक्ला यांच्याशिवाय कोणीही जाहीरपणे बोलले नाही. परंतु, प्रदर्शनानंतर अवघ्या ७ महिन्यांनी अभिनेता सैफ अली खानने मौन सोडलं.फिल्म कंपेनियनला दिलेल्या मुलाखतीत सैफने याबाबत खुलासा केला. तो म्हणाला, तो स्वतःला इतका मोठा स्टार समजत नाही की त्याचे सगळेच प्रोजेक्ट्स हिट ठरतील. नवदीप सिंग दिग्दर्शित 'लाल कप्तान' २०१९ मध्ये प्रदर्शित झाला होता. याचं उदाहरण देतं सैफ म्हणाला, "हा चित्रपट प्रदर्शित झाला त्याचं दिवशी या चित्रपटने ५० लाखांची कमाई केली." 'आदिपुरुष' च्या अपयशाबाबत सांगताना सैफ म्हणाला, "मी एवढाही मोठा स्टार नाही की माझ्या प्रत्येक कलाकृतीला नेहमीच यश येईल."सैफ पुढे म्हणाला, "वास्तववादी असणं खरचं छान आहे, मी स्वतःला कधीच स्टार समजलो नाही. मला स्टार व्हायला आवडतं परंतु मला भ्रमात राहायचं नाही. माझे आई वडील खूप मोठे कलाकार असले तरीही साधे सरळ आणि सामान्य आहेत. जीवनात वास्तव दाखवण्याऱ्या गोष्टी बऱ्याच आहेत आणि माझं नेहमी अशा गोष्टींकडे लक्ष असतं. अपयशाची भीती बाळगण्याची काहीच गरज नाही. 'आदिपुरुष'चं उदाहरण द्यायचं झालं तर लोक म्हणतात, "ही निवड खूप धाडसी होती." लोकं जोखिम घेण्याबद्दल बोलतात, जरी तुम्ही कोणत्याही गोष्टीत अपयशी ठरलात तरीही ती जोखिम नसते.

# जसप्रीतची पुन्हा एकदा चमकदार कामगिरी!

## वेगवान गोलंदाज महत्त्वाची भूमिका बजावू शकतात हे बुमराने दाखवून दिले

नवी दिल्ली ।
।वृत्तसंस्था

**नुकत्याच पार पडलेल्या इंग्लंडविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यात जसप्रीत बुमराने पुन्हा एकदा चमकदार कामगिरी करत आपले महत्त्व अधोरेखित केले. भारतातील खेळपट्ट्या फिरकीला अनुकूल मानल्या जातात. मात्र, त्यावरही वेगवान गोलंदाज महत्त्वाची भूमिका बजावू शकतात हे बुमराने दाखवून दिले. भारतासाठी बुमरा इतका महत्त्वाचा का, तो इतरांपेक्षा वेगळा कसा ठरतो, याचा आढावा.**



भारत दौऱ्यावर आलेला इंग्लंडचा संघ 'बॅझबॉल' रणनीतीनुसार खेळतो. त्यांच्या आक्रमक फलंदाजीला वेसण घालण्याचे काम हे बुमराने केले. त्याने दुसऱ्या सामन्यात नऊ गडी बाद करीत निर्णायक भूमिका पार पाडली. खेळपट्टी फिरकीला अनुकूल असतानाही बुमराने आपली छाप पाडली. पहिल्या डावात ४५ धावांत ६ गडी बाद केले. तर, दुसऱ्या डावात त्याने ४६ धावांत ३ फलंदाजांना माघारी धाडले. आपल्या या कामगिरीदरम्यान त्याने अनेक अप्रतिम चेंडू टाकले. याचा फायदा संघाला झाला. दुसऱ्या कसोटीत निर्णायक भूमिका पार पाडल्यानंतर आपण भारतीय संघात जुन्या व नवीन गोलंदाजांमध्ये दुवा म्हणून काम करीत आहे, असे बुमरा म्हणाला. भारतीय संघात सध्या बदलाचे वारे वाहत आहेत. माझ्या परीने सर्वतोपरी मदत करण्यासाठी मी प्रयत्नशील आहे. यापूर्वीच सांगितल्याप्रमाणे मी आकड्यांकडे पाहत नाही. युवा असताना मला आकडे महत्त्वाचे वाटायचे. आता मात्र संघाने यश मिळवले तरी मी समाधानी असतो, असे बुमराने सांगितले. बुमराने ऑली पोपला बाद करताना टाकलेल्या 'यॉर्करची' सर्वत्र चर्चा सुरू आहे. त्याबद्दल बुमरा म्हणाला, "मी युवा असताना सर्वप्रथम 'यॉर्कर' चेंडू टाकण्यास शिकलो. गडी बाद करण्यासाठी तोच योग्य चेंडू असल्याचे मला वाटायचे. मी वकार युनुस, वसिम अक्रम व झहीर खान या दिग्गजांना गोलंदाजी करताना पाहिले होते. त्यांचे अनुकरण करण्याचा माझा प्रयत्न असायचा," असे बुमरा म्हणाला.बुमराचे वेगळेपण हे त्याच्या गोलंदाजी शैलीत (ॲक्शन) आहेत. त्याचा गोलंदाजीचा सामना करणे अनेक आघाडीच्या फलंदाजांना जमत नाही. बुमराचा 'रन अप' जरी फारसा नसला तरीही, आपल्या अचूक गोलंदाजीमुळे बुमराने छाप पाडली आहे. त्याच्या भात्यात 'स्लोवर बॉल', 'यॉर्कर' आणि 'बाऊन्सर' सारखे चेंडू आहेत. डावखुऱ्या फलंदाजांसाठी तर बुमरा आणखी घातक ठरतो. सध्या क्रिकेटच्या सर्वच प्रारूपांत बुमराने भारतासाठी निर्णायक भूमिका पार पाडली आहे. तसेच नवीन व जुन्या अशा दोन्ही चेंडूने बुमरा गोलंदाजी करण्यास सक्षम असल्याने कसोटी सामन्याच्या कोणत्याही सत्रात कर्णधारचा तो हक्काचा गोलंदाज ठरतो.बुमराने आजवर खेळलेल्या ३४ कसोटी सामन्यांत १५५ फलंदाजांना बाद केले आहेत. यामधील ८६ धावांवर ९ गडी ही त्याची सर्वोत्तम कामगिरी आहे. तर, त्याने तब्बल दहा वेळा पाच गडी बाद केले आहेत. बुमराने ८९ एकदिवसीय सामन्यांत १४९ बळी मिळवले आहेत. तर, त्याने दोन वेळा पाच गडी बाद करण्याची किमया साधली.ही निर्णायक राहणार आहे.इतर खेळाडूंप्रमाणे बुमरानेही लहान वयातच खेळण्यास सुरुवात केली. आपली कामगिरी उंचावताना त्याने गुजरातच्या १९ वर्षांखालील संघात स्थान मिळवले. यानंतर बुमराची निवड ही सय्यद मुश्ताक अली या स्थानिक ट्वेन्टी-२० स्पर्धेत झाली. त्याने गुजरात संघाच्या विजयात निर्णायक भूमिका पार पाडली. या स्पर्धेदरम्यान मुंबई इंडियन्सचे तत्कालीन प्रशिक्षक जॉन राइट ही स्पर्धा पाहण्यासाठी आले होते. त्यांचे लक्ष बुमराकडे गेले आणि त्यांनी मुंबई इंडियन्स संघासोबत त्याला करारबद्ध केले. मुंबईसाठी 'आयपीएल'मध्ये त्याने निर्णायक कामगिरी केली.

### माझ्या परीने सर्वतोपरी मदत

भारत दौऱ्यावर आलेला इंग्लंडचा संघ 'बॅझबॉल' रणनीतीनुसार खेळतो.खेळपट्टी फिरकीला अनुकूल असतानाही बुमराने आपली छाप पाडली. पहिल्या डावात ४५ धावांत ६ गडी बाद केले. तर, दुसऱ्या डावात त्याने ४६ धावांत ३ फलंदाजांना माघारी धाडले. आपल्या या कामगिरीदरम्यान त्याने अनेक अप्रतिम चेंडू टाकले. याचा फायदा संघाला झाला.दुसऱ्या कसोटीत निर्णायक भूमिका पार पाडल्यानंतर आपण भारतीय संघात जुन्या व नवीन गोलंदाजांमध्ये दुवा म्हणून काम करीत आहे, असे बुमरा म्हणाला. माझ्या परीने सर्वतोपरी मदत करण्यासाठी मी प्रयत्नशील आहे.

# हॉकीपटूवरुण कुमारवर पॉस्को कायद्यांतर्गत गुन्हा दाखल

## लग्नाचे आमिष दाखवून अनेकवेळा बलात्कार केल्याचा आरोप

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय हॉकीपटू वरुण कुमारवर एका महिलेने लग्नाचे आमिष दाखवून अनेकवेळा बलात्कार केल्याचा आरोप केला आहे. वरुणवर पॉक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी मंगळवारी ही माहिती दिली. वरुण ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकणाऱ्या संघाचा सदस्य राहिला आहे. पीडित महिला सध्या विमान कंपनीत कर्मचारी म्हणून काम करते.**




महिलेने एफआयआरमध्ये दावा केला आहे की, ती १७ वर्षांची असताना २०१८ मध्ये अर्जुन पुरस्कार विजेते वरुण कुमारच्या संपर्कात आली होती. यावेळी वरुण बंगळुरू येथील स्पोर्ट्स अथॉरिटी ऑफ इंडियामध्ये प्रशिक्षण घेत होता. एफआयआरमध्ये महिलेने आरोप केला आहे की वरुण कुमारने तिच्याशी इन्स्टाग्रामद्वारे संपर्क साधला आणि भेटण्याचा आग्रह धरला. तो तिला भेटायला येण्यासाठी मेसेज करत राहिला पण जेव्हा तिने प्रतिसाद दिला नाही, तेव्हा त्याने त्याच्या मित्रांना भेटायला मनवण्यास सांगितले. जेव्हा ती त्याला भेटली, तेव्हा त्याने तिच्यासाठी आपली आवड व्यक्त केली, नंतर ते मित्र झाले आणि नातेसंबंधात आले.त्यानंतर जुलै २०१९ मध्ये वरुणने भविष्याबद्दल बोलण्याच्या बहाण्याने तिला जयनगर, बंगळुरू येथील एका हॉटेलमध्ये बोलावले आणि त्यावेळी ती अल्पवयीन असल्याचे माहीत असतानाही त्याने तिच्याशी शारीरिक संबंध ठेवले. जेव्हा पीडितेने विरोध केला, तेव्हा त्याने त्यांचे नाते आणखी एक पाऊल पुढे नेण्याचे आणि नंतर तिच्याशी लग्न करण्याचे आश्वासन दिले. एफआयआरमध्ये महिलेने म्हटले आहे की, लग्नाच्या बहाण्याने वरुणने पाच वर्षांच्या नात्यात तिच्याशी अनेकवेळा शारीरिक संबंध ठेवले. नंतर वरुणने पीडितेपासून दूर राहण्यास सुरुवात केली आणि तिच्या कॉल आणि मेसेजला प्रतिसाद देणे बंद केले.

### वरुणसाठी 1 कोटी रुपयांचे बक्षीस

यानंतर वरुणने पीडितेला धमकीही दिली की, जर तिने त्याच्यावर लग्नासाठी दबाव आणला, तर तो तिचे फोटो सोशल मीडियावर अपलोड करेल. एफआयआरनुसार, पीडितेने वरुणवर फसवणुकीचा आरोपही केला आहे. या प्रकरणी एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने सांगितले महिलेच्या तक्रारीच्या आधारे आम्ही सोमवारी हॉकीपटूविरुद्ध पॉक्सो कायदा आणि संबंधित कलमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे.मूळचा हिमाचल प्रदेशचा असलेल्या कुमारने २०१७ मध्ये भारतासाठी पदार्पण केले. २०२० च्या टोकियो ऑलिम्पिकमध्ये भारतीय पुरुष हॉकी संघाने कांस्यपदक जिंकले, तेव्हा हिमाचल प्रदेश सरकारने वरुणसाठी १ कोटी रुपयांचे बक्षीसही जाहीर केले होते.